
महासागर अमरावती पान 3
मंगळवार, दि. 1 एप्रिल 2025

# स्विफ्ट डिझायर आणि दुचाकीचा भीषण अपघात

## एक ठार, एकाची प्रकृती गंभीर










**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि. 31 )** तालुक्यातील तळेगाव दशासर पोलीस ठाणे हद्दीतील नागपूर–औरंगाबाद एक्सप्रेस हायवेवर उसळगव्हाण गावानजीक सोमवारी (ता. 31) सकाळी 11 वाजताच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, यवतमाळ जिल्ह्यातील सौजना येथील पंकज महादेव गिरी (50) आणि रमेश उत्तम रोकडे (50) हे सावंगा विठोबा येथे यात्रेसाठी गेले होते. यात्रेनंतर आपल्या नातेवाईकांकडे उसळगव्हाण येथे थांबून ते गावाकडे दुचाकी (क्र. एमएच 32–एफ 4661) ने परत निघाले होते. दरम्यान, पुलगाव कडून भरधाव वेगाने येणाऱ्या स्विफ्ट डिझायर (क्र. एमएच 06–एडब्लू 8075) कारने त्यांना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने पुलगावच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी पंकज महादेव गिरी यांना मृत घोषित केले. तर गंभीर जखमी रमेश रोकडे यांना अधिक उपचारांसाठी सेवाग्राम येथील रुग्णालयात हलविण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच तळेगाव दशासर पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, अपघाताचे कारण आणि स्विफ्ट डिझायरच्या चालकावर कारवाईसंदर्भात पोलीस तपास सुरू आहे.



# घाटलाडकी शेतशिवारात वनविभागाची रात्रीला बिबट शोध मोहीम



**महासागर प्रतिनिधी**

**चांदुरबाजार, ( दि. 31 )** चांदुरबाजार तालुक्यातील घाटलाडकी परिसरात गेल्या कित्येक दिवसापासून बिबट पाळीव प्राण्याची शिकार करत आहे. त्यामुळे या भागात पशु पालकांसह शेतकऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. वनविभागाची रात्रीला बिबट शोध मोहीम या भागात सुरू केली आहे.

अचलपूरचे आमदार प्रविण तायडे यांनी विधानभवनात या बाबत प्रश्न मांडला होता. तसेच तत्काळ योग्य ती कारवाई करत शासनाकडून मदत देण्याची मागणी केली होती. घाटलाडकी परिसरातील या बिबट्याच्या शोधात वनविभागाच्या पथकाने रात्री शोध मोहीम राबविली. मात्र बिबट्याचा कुठेच शोध लागला नाही. त्यामुळे 31 मार्च रोजी सुध्दा रेस्क्यु पथक या परिसरात पाठविण्यात आले आहे. नागरिकांनी रात्रीच्या वेळेस घराबाहेर पडतांना सतर्कता बाळगावी,असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.

# महिलेला ॲसिड फेकण्याची धमकी

## चांगापूर फाट्यावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 31 ) –** पोलिसात केलेली तक्रार परत घेण्यासाठी ॲसिड फेकण्याची धमकी एका महिलेला देण्यात आली. चांगापूर फाट्यावर महिलेला थांबवून शिविगाळ करण्यात आल्याचा आरोप पिडित महिलेने तक्रारीतून केला आहे. याप्रकरणात 29 मार्च रोजी पिडित महिलेच्या तक्रारीवरून हॉटेल व्यवसायीक पुरुषोत्तम हरवाणीसह तिघांविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला.

काही दिवसांपूर्वी हॉटेल विक्रीच्या वादातून तीन जणांनी पुरुषोत्तम हरवाणी यांना मारहाण केली होती. त्यावेळी त्यांच्या तक्रारीवरून तीन जणांविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. त्यावेळी महिलेच्या तक्रारीवरून पुरुषोत्तम हरवाणीविरुध्द विनयभंगाचा गुन्हा नोंदविण्यात आला. या घटनेनंतर आता महिलेने पुरुषोत्तम हरवाणींवर आरोप केला आहे की, पोलिसात दिलेली तक्रार परत घेण्यासाठी ॲसीड फेकण्याची धमकी दिली आहे. या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी आरोपी पुरुषोत्तम हरवाणी (60), आदर्श हरवानी (35) व विरभान झांबानी (50) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# घरावर दगडफेक करून सामानाची तोडफोड

## अंजनगावच्या चौसाळा गावातील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.31 )** अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन हद्दीतील चौसाळा गावात एका घरावर दगडफेक करून, साहित्यांची तोडफोड करण्यात आली. ही घटना 29 मार्च रोजी रात्री 7.30 वाजताच्या सुमारास घडली. श्याम दशरथ दखने (43, रा. चौसाळा, अंजनगावसुर्जी) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी धनराज जानराव पाखरे (45), गुणा दिलीप पाखरे (36), शंकर दिलीप पाखरे (34), विशाल दुर्योधन पाखरे (40), दिनेश श्यामराव पाखरे, दिलीप जानराव पाखरे (65, सर्व रा. चौसाळा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस सूत्रांनुसार, 29 मार्चच्या रात्री श्याम दखने हे त्यांच्या दुचाकीवरून पिठाच्या गिरणीवर गेले होते. तिथे आरोपी धनराज आणि गुणाने त्यांना थांबवले आणि शिवीगाळ केली. त्यानंतर श्याम हे परत जात असताना, दोघांमध्ये पुन्हा वाद झाला. त्यावेळी श्याम यांना चापट मारण्यात आली. त्यावेळी त्याच्या हातात चाकू असल्याचे पाहून श्याम हे घरी निघून गेले. परंतू त्यानंतर रात्री 10.30 वाजताच्या सुमारास श्याम यांना नितीन उके यांचा फोन आला की घरावर दगडफेक होत आहे. त्यावेळी श्याम हा दुचाकीने घरी पोहोचला. त्यावेळी सर्व आरोपी त्याच्या घरावर दगडफेक करत होते. दरम्यान, आरोपींनी घरासमोरील दुचाकी आणि इतर वस्तूंची तोडफोड केली. या तोडफोडीमुळे श्याम यांच्या घराचे सुमारे 1 लाख 10 हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले आहे. या घटनेची तक्रार श्याम दखने यांनी अंजनगाव सुर्जी पोलिसांत दिली. त्यानुसार पोलिसांनी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## दारु विक्रेता महिला पोलिसांच्या ताब्यात

**अमरावती** – वलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील समता नगरात पोलिसांनी एका महिलेला दारुची अवैध विक्री करताना पकडले. याप्रकरणात पोलिस उपनिरीक्षक रविंद्र खेडेकर यांनी 30 मार्च रोजी वलगाव ठाण्यात तक्रार नोंदविली आहे. त्यानुसार पोलिसांनी आरोपी महिलेविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. महिलेच्या ताब्यातून दारुचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



## पॅराडाईज कॉलनीतून 40 हजाराचे वायर लंपास

**अमरावती** – गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पॅराडाईज कॉलनीतून 40 हजाराचे वायर चोराने लंपास केले. या घटनेची तक्रार अजहर खान इनाममुरहीम खान (42, रा. पॅराडाईज कॉलनी) यांनी 30 मार्च रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला.

# भाजीपाला कापण्याच्या चाकूने पत्नीवर हल्ला

## मोर्शी ठाण्यात पतीविरुध्द गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 31 ) –** मद्यपी पतीने भाजी कापण्याच्या चाकूने पत्नीवर चाकूने हल्ला केल्याची घटना मोर्शी पोलीस स्टेशन परिसरातील पिंपळपुरा परिसरात घडली. याप्रकरणात 30 वर्षीय महिलेच्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी 30 मार्च रोजी आरोपी पती अब्दुल झाकीर अब्दुल साबीर (32९ याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पोलिस तक्रारीनुसार, अब्दुल जाकिर हा दारू पिऊन घरी आला आणि त्याने पत्नीला शिविगाळ केली. त्यामुळे शिवीगाळ का करता, असे पत्नीने विचारले. त्यावेळी अब्दुल झाकीरने भाजी कापण्याच्या चाकूने पत्नीवर वार केला आणि तिला जखमी केले. तसेच आरोपीने पत्नीला थापड्याने मारहाण करून, तिच्या मांडीवरही चाकूने वार केला. त्यामुळे जखमी पत्नीने मोर्शी पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. याप्रकरणात पत्नीच्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी पती अब्दुल झाकीरविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# धारणीच्या साद्राबाडीत तरुणाला मारहाण

## समुहाचे कर्ज देत नसल्याने झाला वाद



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 31 )** गावातील समुहाचे कर्ज परत देत नसल्याच्या कारणावरून झालेल्या वादानंतर एका तरुणाला मारहाण करण्यात आली. ही घटना धारणी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील साद्राबाडी परिसरात 29 मार्च रोजी घडली. याप्रकरणात अमित मगनलाल धानु (32, रा. देडतलई) याच्या तक्रारीवरून धारणी पोलिस ठाण्यात आरोपी विजय रामप्रसाद बडोदे (40, रा. देडतलई) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

अमित व विजय हे एकमेकांचे नातेवाईक असून, अमितने आरोपी विजयला गावातील समुहाचे 65 हजाराचे कर्ज दिले होते. परंतू विजय बडोदे ते पैसे देत नव्हता. त्यामुळे अमित त्याला कर्ज फेडण्याबद्दल म्हटले असता, विजयने त्याला काठीने मारहाण केली. त्यामुळे अमित जखमी झाला. या घटनेची तक्रार अमित धानू यांनी धारणी पोलिसांत दिली. त्यानुसार पोलिसांनी विजय बडोदे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# प्रत्येक घरात गुढीची पूजा करून पाडवा साजरा

## घटस्थापनेने झाली चैत्र नवरात्रीची सुरुवात



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 31 ) –** हिंदू नववर्षाचा पहिला दिवस गुढीपाडवा रविवारी (दि. 30)शहरासह संपूर्ण जिल्ह्यात उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी बहुतांश सर्व लोकांनी घरोघरी गुढी (विजय ध्वज) उभारून श्रध्देने व भक्तीभावाने पूजन केले. चैत्र महिन्यातील शुक्ल पक्ष प्रतिपदा तिथीला साजरा होणाऱ्या या सणात लोक आपली घरे सजवून नवीन कपडे घालतात. ते गुढी (विजय ध्वज) बसवतात आणि त्याची पूजा करतात. गोड पदार्थ आणि पारंपारिक पदार्थ घरी तयार केले जातात. कडुलिंबाची पाने प्रसाद म्हणून वाटली जातात. सुगीच्या हंगामाची चांगली सुरुवात व्हावी, घरामध्ये वर्षभर समृद्धी आणि उत्तम आरोग्य राहावे, या शुभेच्छा देत साजरा होणाऱ्याएक काठी घेऊन त्यावर चांदी, तांबे किंवा पितळेचे भांडे उलटे ठेवण्यात आले. तसेच यामध्ये भगव्या रंगाचा ध्वज लावून त्याला आंब्यांची व कडुलिंबाची पाने आणि फुलांनी सजविण्यात आले होते. त्यानंतर तयार झालेली ही गुढी घराच्या सर्वोच्च स्थानी ठेवून त्याची पूजा करण्यात आली. तसेच शहरातील सर्व देवी मंदिरात व घरोघरी घटस्थापनेने चैत्र नवरात्रोत्सवाची सुरुवात झाली. पहाटेपासूनच लोकांनी घरोघरी आंब्याची पाने, रांगोळी, तोरण सजवून गुढीसह मातेचे स्वागत केले. दिवसभर मंदिरांमध्ये भाविकांची अलोट गर्दी होती. गुढीपाडवा अतूट बांधिलकीचा उत्सव असल्याचे म्हटले जाते.

### युवा विद्यार्थी संघटनेन उभारली 60 फूट उंच गुढी

महाराष्ट्रात साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला गुढी पाडवा हा हिंदू नववर्ष म्हणून साजरा केला जातो. गुढीपाडव्याच्या सणाचे औचित्य साधून रविवारी सकाळी 10.30 वाजता युवक विद्यार्थी संघटनेतर्फे 60 फूट उंचीची गुढी (विजय ध्वज) उभारण्यात आली. स्थानिक राजकमल चौकात स्थानिक राजकमल विद्यार्थी संघटनेतर्फे गेल्या 11 वर्षांपासूनची गुढीपाडवा साजरा करण्याची परंपरा कायम ठेवत हेच आमुची प्रार्थना हेच आमुचे मागणे, माणसाने माणसाशी मणसा सम वागणे... असा संदेश देत गुढीपाडवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. पोलिस विभागाच्यावतीने हेडकॉन्स्टेबल बेबी पाटील, उषा पांडे, नागरिकांनी या गुढी (विजय ध्वज) गुढीची विधीवत पूजन करून आरती करण्यात आली.

### नऊ दिवस उपासना आणि उपवास

घटस्थापना अंतर्गत विदर्भातील कुल स्वामिनी अंबादेवी, एकवीरा देवीच्या मंदिरांसह महाकाली माता मंदिर, वैष्णोदेवी मंदिर, दुर्गा मंदिर आदी मंदिरांमध्ये विविध धार्मिक विधी पार पडले, आता नऊ दिवस पूजाअर्चा सुरू राहणार आहे. अनेक भाविक नऊ दिवस उपवास करून पूजा करतात. चैत्र नवरात्रीच्या शेवटच्या दिवशी रामनवमी साजरी केली जाते. त्यामुळे राम मंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. त्यानुषंगाने संपूर्ण जिल्ह्यात उत्साहाचे आणि भक्तीभावाचे वातावरण आहे.

## काँग्रेस भवनावरही उभारण्यात आली 'गुढी'



गुढीपाडव्यानिमित्त अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस भवनाच्या नवीन इमारतीवर गुढीची प्रतिष्ठापना करून शहराध्यक्ष बबलू शेखावत यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला जिल्ह्याचे माजी पालकमंत्री एड. यशोमती ठाकूर, माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष भैय्या पवार, महिला काँग्रेसच्या अध्यक्षा जयश्री वानखडे उपस्थित होत्या. अमरावतीवासीयांच्या सहभागाने काँग्रेस पक्षाच्या प्रेरणादायी व लोककल्याणकारी कार्याला नवी ऊर्जा मिळावी व नवीन वर्षाच्या या नव्या प्रारंभात एकता, प्रगती व समृद्धी प्राप्त व्हावी, असा संकल्प यावेळी करण्यात आला.

## बाजारात जोरदार खरेदी

गुढीपाडवा हा वर्षातील साडेतीन मुहूर्तांपैकी एक अत्यंत शुभ मुहूर्त मानला जातो. यावेळी बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. इलेक्ट्रॉनिक वस्तूंपासून ते वाहने, भांडी आणि सोने–चांदीची खरेदी करण्यात आली. पहाटेपासूनच गांधी चौक, गाडगे नगर, भाजी बाजार, राजापेठ, आंब्याची पाने, कडूनिंबाची पाने, हर्सुला, गाठी परिसरातील पदपथांवर सजलेल्या दुकानांमध्ये ग्राहकांची मोठी गर्दी होती. लोकांनी घराच्या छतावर गूढी उभारली. त्यानंतर रात्री उशिरापर्यंत खरेदी सुरू होती.

# अनियंत्रित होऊन उलटली बोलेरो, चालकाचा मृत्यू

**अमरावती** – भरधाव बोलेरो पिकअप वाहन अनियंत्रीत होऊन उलटल्याने चालकाचा मृत्यू झाला. ही घटना माळेगाव ते मार्डी रोडवरील शेंदोळा फाट्यावर 29 मार्च रोजी घडली. सुखलु हिरालाल नरसे (38, रा. डोंगरपूर, ता. मुलताई, जि. बैतुल) असे मृताचे नाव आहे. या घटनेची तक्रार सुखदेव किसन दईके (38, रा. डोंगरपूर, जि. बैतुल) यांनी 30 मार्च रोजी कुर्हा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी सुखलु नरसेविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

तक्रारीनुसार, सुखलू हिरालाल नरसे हे बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एमएच 27 बीएक्स 1343 घेऊन शेंदोळा येथून मार्डी रोड मार्गे मालेगावला जात होते. दरम्यान त्यांचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि वाहन उलटले. त्यामुळे सुखलू नरशे हा वाहनाच्या फाटकात दबला आणि त्याचा मृत्यू झाला. या घटनेच्या माहितीवरून कुऱ्हा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. त्यानंतर सुखदेव दईकेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# गावठी बॉम्बमुळे गाईचा जबडा फाटला; 72 जिवंत गावठी बॉम्ब जप्त

## सावर्डीतील औद्योगिक वसाहत परिसरात घटना उघडकीस ■ पिंपळविहीर येथील किशोर भोसले नामक आरोपीविरुध्द गुन्हा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 31 )** गावठी बॉम्ब चघल्याने स्फोट होऊन गाईचा जबडा फाटून तिला गंभीर दुखापत झाली आहे. ही धक्कादायक घटना 30 मार्च रोजी नांदगाव पेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील औद्योगिक वसाहतीच्या श्राफ कंपनीजवळील मोकळ्या जागेत घडली. याप्रकरणात जुबेर खान सिराज खान (27, रा. सावर्डी, पिंपळविहिर) यांच्या तक्रारीवरून आरोपी किशोर पंजुमल भोसले (रा. पिंपळविहिर) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सावर्डी येथील दुग्ध व्यावसायिक जुबेर खान यांच्याकडे 20 गाई व 15 म्हशी आहेत. 30 मार्च रोजी त्यांचा मजूर बाल्या पवार हा नांदगाव पेठ एमआयडीसीतील श्राफ कंपनीजवळील खुल्या जागेत जनावरे चराई करीत होता. दरम्यान या जनावरांपैकी एका गाईने नांदगाव पेठ एमआयडीसी परिसरातील जमिनीवर पडून असलेला गावठी बॉम्ब तोंडात चघळला असता, अचानक स्फोट झाला आणि गाईचा जबडा फाटला. याबाबतची माहिती मजूर बाल्या पवारने निलेश काडकर यांच्या फोनवरून जनावर मालक जुबेर खानला दिली. त्यानंतर जुबेर खान व त्यांचे वडिल सिराज खान हे घटनास्थळी पोहोचले. त्यांनी ही माहिती नांदगाव पेठ



### रानडुक्करांच्या शिकारासाठी पेरले बॉम्ब

यांप्रकरणात पोलिसांनी किशोर भोसलेला ताब्यात घेतले असता, या गावठी बॉम्बचा वापर किशोर भोसलेकडून रानडुकराच्या शिकारीसाठी केला जात असल्याचे माहिती पुढे आली. या प्रकरणी जुबेर खान यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी किशोर भोसलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांना दिली. घटनेचे गांभीर्य पाहता पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठले. दरम्यान पोलिसांनी चौकशी केली असता, या भागात किशोर भोसले गावठी बॉम्ब ठेवत असल्याचा संशय जुबेर खानने व्यक्त केला. त्यामुळे नांदगाव पेठचे एपीआय रितेश राऊत यांनी तत्काळ बीडीडीएस पथकाला याबाबत माहिती दिली. त्यानंतर बीडीडीएसचे पीआय रवींद्र जेधे हे त्यांच्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले. यावेळी नांदगाव पेठ पोलिस व बीडीडीएसच्या पथकाने आरोपीची शोध मोहीम राबविली असता, किशोर भोसलेच्या घरात 72 जिवंत गावठी बॉम्ब आढळून आले. जप्त केले.

# बौद्ध उपासिका-उपासकांची सभा 5 एप्रिल ला



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 31 )-** भारतीय बौद्ध महासभेची स्वतंत्र महिला कार्यकारिणी होणार असून त्याकरिता 5 एप्रिल रोजी बौद्ध उपासिका-उपासकांची सभा संघमित्रा वसतीगृह परिसरातील सभागृह येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेला बौद्धजनांनी हजारोच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष (पूर्व विभाग) प्रा. प्रकाश बोरकर यांनी केले. भारतीय बौद्ध महासभा बडनेरा अमरावती शाखेच्या वतीने रविवारची 331 वी बुद्ध वंदना बोरगाव ( धवणे) येथील महाबोधी प्रज्ञासूर्य बुद्ध विहार येथे रविवारी (दि. 30) पार पडली. अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष बोरकर तर मार्गदर्शक म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे कार्यालयीन सचिव राहुल शेंडे, जिल्हा पर्यटन सचिव नयन मोंढे, नांदगाव खंडेश्वर तालुका अध्यक्ष मदन खंडारे धम्मपिठावर विराजमान होते. संचालक समता सैनिक दलाचे प्रमुख सुरेश दहाटे यांनी तर आभार उपसरपंच अनिरुद्ध धवणे यांनी मानले. रविवारच्या वंदनेला खुशाल सांबारे, गोवर्धन रामटेके, अरुण मेश्राम, प्रवीण खंडारे, माया बोरकर, त्रिशा बाते, समृद्धी खोब्रागडे, मालती मेश्राम, शुभांगी रामटेके, स्वरूप रामटेके, नयना बोळे, आरदा राऊत, सुनिता गवई, सविता धवणे, शीला हरणे, मीना धवणे, शारदा धवणे, धनश्री धवणे, सोनाली धवणे, सारिका धवणे, मालता धवणे, किशोर खोब्रागडे, पंजाब धवणे, मुकुंद मेश्राम, अशोक बनसोड, विजय धवणे, रवींद्र गेडाम, अशोक तायडे, अवधूत धवणे, शशिकांत धवणे, प्रकाश वागळे, बाळकृष्ण बोधनकर, सुलोचना धवणे, मालता धवणे, विलास नागदिवे, सुजाता धवणे, शिल्पा धवणे, तनुश्री धवणे, रमा राऊत, दुर्गा धवणे यांच्यासह भारतीय बौद्ध महासभा, बोरगाव (धवणे) येथील ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# कुंभारवाडा येथील पट्टाभि श्रीराम मंदीरात श्रीरामनवमी उत्सव

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि. 31 )** अमरावती शहरातील कुंभारवाडा येथील पट्टभि श्रीराम मंदिर संस्थानतर्फे यंदाही भव्य श्रीराम नवमी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव रविवार 30 मार्चपासून सुरू झाला असून सोमवार 8 एप्रिल पर्यंत चालणार आहे.

या महोत्सवामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये कीर्तन, प्रवचन, भजन आणि इतर धार्मिक कार्यक्रमांचा समावेश आहे. या कार्यक्रमांचा अमरावती शहरातील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले आहे. या महोत्सवाचा मुख्य कार्यक्रम म्हणजे श्रीराम जन्मोत्सव हा रविवारी 6 एप्रिल रोजी दुपारी 12 वाजता होणार आहे. या कार्यक्रमासाठी मंदिराला विशेष सजावट करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी अमरावती महानगरपालिकेचे आयुक्त सचिन कलंत्रे, अमरावती जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल, अमरावतीचे माजी महापौर विलास इंगोले आणि बाराबलुतेदार महासंघाचे अध्यक्ष डॉ. श्रीराम कोल्हे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. 30 मार्चला गायत्री महिला भजनी मंडळ, माळीपुरा तर 31 मार्च रोजी एकविरा महिला भजनी मंडळ यांनी मंत्रमुग्ध करणारे भजन सादर केले.1 एप्रिलला श्री मुरलीधर महिला भजनी मंडळ, 2 एप्रिल रोजी गजानन महाराज महिला भजनी मंडळ, कुंभारवाडा, 3 एप्रिल गजानन महाराज महिला भजनी मंडळ, 4 एप्रिल ब्रह्मचैतन्य महिला भजनी मंडळ आणि 5 एप्रिल रोजी राधाकृष्ण महिला भजनी मंडळ व्दारे भजन सादर होईल. तसेच रात्री 9 ते 10 या वेळेत सुंदरकांड पठण होईल. 6 एप्रिल श्रीराम जन्मोत्सव दुपारी 12 वाजता साजरा होईल. अनिल गुल्हाने श्रीराम कथा वाचन करतील. तसेच, दुपारी पद्मावती महिला भजनी मंडळ व्दारे भजन सादर होईल.7 एप्रिल सकाळी 9 वाजता सत्यनारायण पूजा होईल. दुपारी भक्ती मंदीर महिला भजनी मंडळाव्दारे भजन सादर होईल व यानंतर गोपालकाला कार्यक्रम होईल. भजनी मंडळाचा कार्यक्रम मीना गुल्हाने व संगिता तिप्पट यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. तरी सर्वांनी याचा लाभ घ्यावा अशी विनंती पट्टाभि श्रीराम मंदीर संस्थानचे अध्यक्ष डॉ. विलास नांदुरकर, उपाध्यक्ष अंबादास नलगे, सचिव राजेश हरमकर, सहसचिव गोपाल कळसकर, कोषाध्यक्ष विवेक अंबुलकर, सदस्य हरिसिंग ठाकूर, संजय खारकर, महेश नांदुरकर, लक्ष्मण शिरभाते, सुरेश पाखरे, मीना गुल्हाने यांनी केली आहे.कार्यक्रमासाठी गोपाल कळसकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असून त्यात श्री ऋषिकेश ठाकूर व आदित्य विटाळकर यांचा समावेश आहे.

# भगतसिंग चौकात शुद्ध थंड पाण्याचे मशीन; तहानलेल्यांसाठी सेवाभावी उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि.31 )-** तहानलेल्यांना शुद्ध थंड पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने येथील श्री नवदुर्गा नागरी सहकारी पतसंस्था व अमर शहीद भगतसिंग मंडळाच्या सौजन्याने भगतसिंग चौकात थंड पिण्याच्या पाण्याचे मशीन बसविण्यात आले आहे. या उपक्रमाचा शुभारंभ आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते आणि राष्ट्रीय स्वयंसेवक



संघाचे प्रांत कार्यकारिणी सदस्य चंद्रशेखर राठी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

भगतसिंग चौक रेल्वे स्थानकाजवळ असल्याने येथे सतत प्रवाशांची वर्दळ असते. उन्हाळ्यात थंड पाण्याची गरज अधिक भासते, मात्र सर्वांना पाण्याच्या बाटल्या विकत घेणे शक्य नसते. हे लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी जपत पतसंस्था व मंडळाने हा उपक्रम सुरू केला आहे. या प्रसंगी पतसंस्थेचे संचालक योगेश अंभोरे, मुख्य व्यवस्थापक दिनेश बोबडे, मा. नगरसेवक विनोद धूर्वे, तसेच प्रशांत बदनोरे, चंदू पाटील,अविनाश देशमुख, विनोद जयस्वाल, नवनीत हलुमारे, नवीन धोटे, अविनाश पेटले,बंटी नागोसे, राजू घड्डीनकर, दिलीप छांगानी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अशोक शर्मा यांनी केले.

# युवासेनेच्या मॉक टेस्टला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर ( दि. 31 ) –** स्पर्धा परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता युवासेनेच्या वतीने (ठाकरे गट) मॉक टेस्टचे आयोजन (दि.29) करण्यात आले होते. त्यात अकरावी व बारावीच्या 275 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. रत्नाबाई राठी हायस्कूल, दर्यापूर येथे सकाळी 10 ते दुपारी 1 या वेळेत ही टेस्ट घेण्यात आली. या परीक्षेकरिता विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली होती. युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी शिवसेना संपर्कप्रमुख सुधीर सूर्यवंशी, आ. गजानन लवटे, अरुण पाटील खारोडे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख अलका पारडे, युवती सेना जिल्हाप्रमुख प्रांजली कुलट, बबनराव विल्हेकर, महेंद्र दिप्टे, प्रतीक राऊत, सागर गिरे, विशु सावरकर, गोपाल अग्रवाल, महेश पाटील खारोडे, सरपंच किशोर टाले, सरपंच मोहन बायस्कर, सरपंच विजय आढाऊ, सतीश साखरे, गुणवंत गावंडे, भास्कर धोटे, शरद आठवले, खंडू राऊत, पंकज राणे, पंकज रेखे, राजू मानकर, अमोल अरबट, नंदू पखाले, दीपक बगाडे, रुपेश मोरे, धनंजय पवार, प्रशांत ठाकूर, मोहन खरबडकर, नीलेश होले, सूरज कैकाडी, शिवराज ठाकरे, आशिष लायडे, शुभम विल्हेकर, नितीन माहुरे, बादल सवयी, अमन पटेल, प्रवीण पाटोळे, करण चक्रे, राज गुजराती, नीलेश ठाकरे, श्याम मिरगे, गणेश भगत आदी उपस्थित होते.

# अचलपूरच्या ऐतिहासिक ईदगाहवर नमाज अदा

## काळ्या फिती लावून वक्फ विधेयकाचा विरोध

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि. 31 ) –** अचलपूरच्या ऐतिहासिक ईदगाहवर सोमवारी सकाळी रमजान ईदची नमाज अदा करण्यात आली. रविवारी चंद्रदर्शन झाल्यानंतर शहरात ईदच्या तयारीला वेग आला आणि सोमवारी सकाळी 9 वाजता मोठ्या संख्येने मुस्लिम समाजाच्या बांधवांनी ईदची नमाज अदा केली. नमाजनंतर सर्वांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आणि शांतता व बंधुभावाचा संदेश दिला.





यंदा ईदची नमाज विशेष ठरली, कारण नमाज अदा करणाऱ्या लोकांनी त्यांच्या बाहूंवर काळ्या फिती बांधून वक्फ मध्ये अस्तक्षेप विधेयकाचा विरोध दर्शवला. समाजातील अनेकांचा असा विश्वास आहे की हे विधेयक वक्फ संपत्तीच्या संरक्षणासाठी धोकादायक आहे, त्यामुळे शांततेत राहून याचा विरोध करण्यात आला. अचलपूर विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार बच्चू कडू विशेषत: ईदगाहवर उपस्थित राहिले आणि जमलेल्या नागरिकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. त्यांनी सर्वांना एकजूट राहण्याचा आणि समाजात सलोखा टिकवण्याचा संदेश दिला. या प्रसंगी काझी-ए-शहर सय्यद ग्यासोद्दीन साहेब, खातिब-ए-शहर सय्यद अफजल हुसैन, सगीर हुसैन, सय्यद एजाज हुसैन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

त्यांनी नागरिकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आणि अमन व शांततेसाठी प्रार्थना केली. शहरात ईदचा सण शांततेत आणि उत्साहात पार पडला. बाजारपेठा खरेदीसाठी गजबजलेल्या दिसल्या, तर लहान मुलांमध्ये आणि तरुणांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण होते. मस्जिद आणि ईदगाह परिसरात पोलिसांचा कडक बंदोबस्त होता, ज्यामुळे नमाज अदा करताना कोणत्याही प्रकारची अडचण आली नाही. स्थानिक प्रशासनाने देखील नमाजासाठी उत्तम सुविधा उपलब्ध करून दिल्या. अचलपूरमध्ये ईद नेहमीच बंधुभाव आणि सौहार्दाच्या वातावरणात साजरी केली जाते, आणि यंदाही ही परंपरा कायम राहिली. नमाजनंतर लोकांनी आपल्या नातेवाईक व मित्रमंडळींच्या घरी जाऊन एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छा दिल्या.

मिठाई आणि शीरखुर्म्याच्या सुगंधाने संपूर्ण शहर भारावून गेले. या वेळी फिरोज खान, मो. अजहरुद्दीन, इरशाद अहमद, सय्यद असलम, हाफिज इमरान खान, शहजाद नूरी, अमजद खान, हाफिज अदनान रजा, मौलाना अझहर, हाफिज मुदस्सिर, हाफिज अखलाक, हाफिज अझहर, हाफिज अहफाज, हाजी इब्राहिम खान, हाजी मलग साबिर बावा, एहतेशाम नबील, मोसीन खान, मस्तान भाई आणि अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# बडी ईदगाह येथे रमजान ईद उत्साहात साजरी

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.31 )–** मोठी ईदगाह सुर्जी येथे मोठ ?ा उत्साहाने रमज़ान ईद ची नमाज सकाळी 9 वाजता पठन करण्यात आली. यावेळी सर्व मुस्लीम बांधवांनी एकमेकांना गळा भेट घेऊन प्रेम, शांतता, सदभावना आणि जिव्हाळ्याचा संदेश देणाऱ्या पवित्र रमजान ईद सणाच्या निमित्ताने सर्व मुस्लिम बांधवांनी एकमेकांना हार्दिक शुभेच्छा दिल्यात.

आपल्या देशात हिंदू - मुस्लीम समाजात सर्वांमध्ये सदभावनेची गळाभेट व्हावी , बंधुभाव वाढावा, समाजात एकता आणि सामंजस्य नांदावे, हीच ईश्वरचरणी प्रार्थना केली.



अंजनगाव सुर्जी शहरातील व ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणात मुस्लीम बांधव नमाज पठण करण्याकरिता उपस्थित होते. पोलीस विभागाच्या वतीने मोठ्या प्रमाणात बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

यावेळी आमदार गजानन लवटे यांनी भेट देऊन सर्वांना शुभेच्छा दिल्यात यांप्रसंगी मिर्झा ज़हीर बेग, आशिक अन्सारी, नाजीम खतीब, अफसर बेग, प्रदिप देशमुख, कैलास शिरसाठ,मनोज लहुपंचाग सह उपस्थित होते.

# चांदूर रेल्वे शहरात 'ईद-उल-फित्र' उत्साहात साजरी

### ईदगाह वर सामुहीक नमाज पठन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे ( दि.31 )–** मुस्लिम बांधवांचा रमजान ईद हा सण चांदूर रेल्वे शहरात सोमवारी (ता. 31) मोठ्या उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी शहरासह तालुक्यातील शेकडोंच्या संख्येने आलेल्या मुस्लीम बांधवांनी ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज पठण करत अल्लाहला साकडे घातले.



महिनाभर रमजानचे रोजे ठेवल्यानंतर सोमवारी मुस्लिम बांधवांनी ईद-उल-फित्र उत्साहात साजरी केली. मुस्लिम धर्मातील अनेक उत्सवांमधील महत्त्वाचा उत्सव म्हणजे 'रमजान ईद'. आपापसांतील हेवेदावे व मत्सर विसरून सर्वांनी एकत्र यावे, असा संदेश या सणाने दिला. रमजान ईद म्हणजे जणू मानवीमनाचे दुवे साधण्याबरोबरच आत्मशुद्धीची शिकवण देणारा सण. ईदच्या नमाजासाठी ईदगाहमध्ये जाण्यापूर्वी दानधर्म करण्याचा संदेश मुस्लिम धर्मात देण्यात आला आहे. त्यालाच 'सदका-एक-फित्र' म्हणतात. ईद साजरी करत असतांना समाजातील दीनदुबळ्यांबाबत जाणीव असावी, हाच त्यामागचा उद्देश. याच अनुशंगाने अनेक शहरवासीयांनी गरीब व गरजूंना आर्थिक स्वरूपात मदत करूनच ईदच्या नमाजसाठी ईदगाहवर प्रवेश केला. शहरातील ईदगाह मैदानावर सकाळी 8 वाजता मुख्य नमाज अदा करण्यासाठी शहर आणि परिसरातील अनेक मुस्लिम बांधवांनी गर्दी केली होती. ईदगाहवर मौलवी काशिफ यांनी नमाज पठन केले. यासोबत कुऱ्हा रोडवरील चौकातील मस्जिदमध्ये सुध्दा सकाळी 8.30 वाजता ईदची नमाज पठन करण्यात आले. नमाजनंतर शांततेसाठी दुआ करून एकमेकांची गळाभेट घेतली अन् ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या. ईदनिमित्त सकाळपासून मुस्लिम बांधव नवीन कपडे घालून नमाज अदा करण्यासाठी ईदगाह मैदानाकडे जात होते. तेथे या सर्वांनी एकत्रित येऊन ईद-उल-फित्र' साजरी केली. ईदच्या दिवशी प्रत्येक मुस्लिम बांधवांच्या घरी बनवला जाणारा गोड पदार्थ म्हणजे शीरखुर्मा. दूध, शेवया आणि विविध प्रकारच्या सुक्यामेव्याचे मिश्रण असलेला शीरखुर्मा ईदचा आनंद द्विगुणित करतो. शीरखुर्म्याची लज्जत चाखण्याकरिता सकाळपासून रात्रीपर्यंत प्रत्येक मुस्लिम बांधवांच्या घरात लगबग सुरू होती.

### माजी आमदार वीरेंद्र जगताप यांनी दिल्या शुभेच्छा

ईदगाह मैदान परीसरात मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप, जगदीश आरेकर, निवास सूर्यवंशी, शिट्टु सूर्यवंशी, अनिस सौदागर, हर्षल वाघ, परिक्षित जगताप, दीपक सोळंके, सुमेध सरदार, संघपाल हरणे, सारंग देशमुख, सतपाल वरठे, महेश कलावटे, हमीद कुरैशी, रितेश शेळके, आकाश इमले, सागर भोंडे, सागर गरुड, सक्षम वानखडे, संदीप शेंडे, रुपेश पूडके, राजू लांजेवार, देवानंद खुणे, पंकज मेश्राम यांच्यासह काँग्रेसचे अनेक नेतेगण, कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी मुस्लीम बांधवांच्या भेटी घेत आलिंगन देत शुभेच्छा दिल्या.